किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● पुनर्भेट

५ ● स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर उच्च शिक्षण

१२ ● शंभरी ओलांडलेली खाकी... !

१९ ● मौखिक इतिहास संकलनाचा अनोखा प्रयोग

२४ ● राजाश्रयाकडून लोकाश्रयाकडे...

२७ ● जितकी छोटी तितकी स्वच्छ आणि सुंदर



**खंड १७ : अंक १** **एप्रिल २०१८**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**


**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.


वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website-http:// www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १७ (अंक १) एप्रिल २०१८**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**


### *अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# पुनर्भेट

‘अर्थबोधपत्रिके’च्या संपूर्ण कुटुंबाशी प्रदीर्घ काळानंतर भेटीचा योग येतो आहे. २०१८ सालातील एप्रिल महिन्याचा अंक सप्टेंबर महिना संपता संपता वाचककुटुंबाच्या हातात पडतो आहे, ही, ‘संपादक’ या नात्याने मला व्यक्तिशः विलक्षण लाजीरवाणी बाब वाटते. त्याबद्दल मी मनःपूर्वक दिलगिरी व्यक्त करतो. परंतु, या सगळ्या प्रदीर्घ विलंबाला कारणेही तितकीच जटिल स्वरूपाची होती. मात्र, सगळीच घडी आता नव्याने बसते आहे. या सगळ्या काळात ‘अर्थबोधपत्रिके’च्या वाचककुटुंबाने जी सहनशीलता दाखवली आणि संस्थेवरील विश्वास अभंग राखला त्यांबद्दल आम्ही सगळेच आपले अत्यंत ऋणी आहोत. ‘अर्थबोधपत्रिके’च्या वर्षभरातील १२ अंकांच्या माध्यमातून दरवर्षी जेवढ्या छापील पानांचा मजकूर वाचकवर्गाला सादर करण्यास आम्ही बांधील आहोत तेवढा मजकूर येत्या काळात वाचकांच्या पुढ्यात सादर करण्यात येईल, यांबाबत वाचकांनी कृपया विश्वास बाळगावा. चालू कॅलेंडर वर्षातील मे ते सप्टेंबर २०१८ या काळातील अंक येत्या काळात आपल्या हाती येतील. साधारणपणे २०१८ सालातील नोव्हेंबर महिन्यापासून ‘अर्थबोधपत्रिके’चे सगळे वेळापत्रक पूर्ववत स्थिरपद होईल, असे आमचे प्रयत्न आहेत. ‘अर्थबोधपत्रिके’सारखे एक अनोखे नियतकालिक, त्याच्या निर्मितीच्या मुळाशी असणारा गाभाहेतू आणि दर्जा या उभयतांशी अणुमात्रही तडजोड न करता प्रकाशित करत राहणे, ही एक मोठी जबाबदारी आहे. ही आत्मश्लाघा नव्हे तर, अंगीकृत उत्तरदायित्वाचा पुनरुच्चार आहे. माहितीचा वर्षाव चहूंकडून अंगावर होत असताना त्यांतून वास्तवाचे काही कवडसे निवडून त्यांवर संपादकीय संस्करण घडवत रोचक पद्धतीने वाचकराजाच्या पुढ्यात सादर करणे, हे मोठे जोखमीचे काम होय. मूळ आधारासाठी वापरलेला संदर्भ आणि त्याला अन्य पूरक तपशीलाची जोड पुरवण्यासाठी केलेली वाचन-मुशाफिरी यांच्या भट्टीमधून, अनुवाद नव्हे तर अनुसर्जन, या साहित्यप्रकारात गणला जाणारा मजकूर तयार करण्याचे जे व्रत संस्थने गेली दोन दशके जपलेले आहे ते आपल्यासारख्या सुजाण वाचकांच्या आशीर्वादाच्या बळावरच.



आपण सगळेच सध्या मोठ्या स्थित्यंतराच्या पर्वामधून मार्गक्रमण करतो आहोत. जगभरात सर्वत्रच सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक... अशा विविध स्तरांवर प्रचंड घुसळण चालू असल्याचे आपण बघतो. अस्थिरता जणू प्रस्थापित नियम बनू पाहते आहे. मनुष्याला अस्थैर्याचे फारसे काही वाटत नसते. अस्थिर असलेली परिस्थिती आज ना उद्या स्थिरावेल, अशी आशा प्रत्येकालाच असते. अस्थिरतेपेक्षाही माणूस भितो अनिश्तिततेला. कारण, अनिश्चिततेला अंतच नसतो. ती केव्हा संपेल यांबाबत कोणीही काहीच सांगू शकत नाही. माणसाला हतबल वाटते ते त्यांपायीच. सध्याच्या अस्थिरतेचा विशेष म्हणजे तिच्यात अनिश्चिततेची गहिराई मिसळलेली आहे. या सगळ्या व्यामिश्रतेचे नानाविध पैलू ‘अर्थबोधपत्रिके’च्या पानांमधून या पुढे वेळोवेळी सादर करण्याचा प्रयत्न राहील. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - ‘अर्थबोधपत्रिके’चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## शिक्षण

# स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर उच्च शिक्षण

भारतातील उच्च शिक्षणाचे क्षेत्र आता एका स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेले आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील सद्यस्थिती आणि वस्तुस्थिती पाहिली तर जगभरातील विद्यापीठे आणि शिक्षणसंस्थांच्या मानांकनामध्ये भारतातील बहुतांश विद्यापीठे पुष्कळ मागे आहेत. ही तफावत इतकी मोठी आहे की, जागतिक स्तरावरील पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये देशातील एकाही विद्यापीठाचा समावेश होत नाही. या मागील कारणांची चर्चा वारंवार झाली आहे. आजही तिच्यात खंड नाही. या शिवाय, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही विविध समस्या निर्माण होऊन त्यांच्यातही गुंतागुंत निर्माण झालेली आहे.

---

**कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये त्या त्या देशातील उच्च शिक्षण देणा-या संस्था, त्यांची शैक्षणिक गुणवत्ता, दर्जा, संशोधन आणि विकासात त्यांचे मिळणारे योगदान या सा-या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आणि संवेदनशील शाबित होतात. आजघडीला, भारतात तब्बल ८५० विद्यापीठे, ३७ हजार २०४ महाविद्यालये आणि ११ हजार ४४३ स्वतंत्रपणे चालवल्या जाणा-या संस्था आहेत. या अवाढव्य संस्थात्मक विस्ताराचे नियमन करणारी 'विद्यापीठ अनुदान आयोग' ही शिखर संस्था स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण करण्यात आली. परंतु, तिच्या जागी आता 'हायर एज्युकेशन कौन्सिल ऑफ इंडिया'(एचइसीआय) ही संस्थात्मक व्यवस्था नव्याने आकारास येणार आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्राला नवी उर्जितावस्था प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने केंद्रशासनाने काही महत्त्वपूर्ण बदल करण्यास सुरुवात केलेली आहे. हे सारे नवीन बदल म्हणजे उच्च शिक्षणातील नव्या घडामोडींची नांदी ठरावेत, अशी निदान अपेक्षा तरी आहे. या बदलाचे देशातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रावर भलेबुरे जे काही परिणाम होतील ते भविष्यात अनुभवण्यास मिळतीलच. या संस्थात्मक स्थित्यंतराचे नेमके स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न या टप्प्यावर उपयुक्त ठरावा.**



### विद्यापीठ अनुदान आयोग

भारतातील उच्च शिक्षणाचा इतिहास पाहायचा झाला तर आपल्याला मागे जावे लागेल ते १९२५ मध्ये. तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड मेकॉलेने आपल्या काही सूचना व शिफारसी ब्रिटिश सरकारसमोर मांडून उच्च शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादित केलेले होते. त्या नंतर १९२५ मध्ये प्रथमतः 'इंटर युनिव्हर्सिटी बोर्डा'ची स्थापना झाली. त्याचेच नाव पुढे 'भारतीय विश्वविद्यालय संघ' असे झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ साली सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली प्रथमतः 'युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन'ची पायाभरणी करण्यात आली. या आयोगाने सल्ला दिला की, एक विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन करण्यात यावा आणि त्या माध्यमातून देशातील सर्व प्रमुख शिक्षणसंस्था व विद्यापीठे त्याला जोडली जावीत. त्या प्रस्तावाबाबत गांभीर्याने विचार करण्यात आला. १९५२च्या केंद्रशासनाच्या निर्णयानुसार, केंद्रीय आणि उच्च शिक्षणसंस्थांना दिल्या जाणा-या अनुदानाचा विनियोग हा त्या आयोगाच्या माध्यमातून करण्यासाठी २८ डिसेंबर १९५३ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना झाली. प्रत्यक्षात आयोगाचे काम १९५६ सालापासून सुरू झाले. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावत नेणे, अभ्यासक्रमात नाविन्य व कालसुसंगतता राखणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे, प्राध्यापकांची पात्रता निश्चित करणे आणि विद्यार्थ्यांना विकासाच्या व संशोधनाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देणे, शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन करणे अशा विविध जबाबदा-या आयोगाच्या खांद्यावर होत्या. उच्च शिक्षणाच्या क्षेत्राचा जसजसा विस्तार-विकास होत गेला तसतसा आयोगावरचा हा भार वाढत गेला. सहा प्रादेशिक कार्यालये सुरू करून उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला गेला खरा; परंतु, त्यालाही मर्यादा होत्या. त्यामुळे, अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्था व विद्यापीठ अनुदान आयोग बंद करून त्याजागी अधिक प्रभावी एकच शक्तिशाली समिती नेमण्याचा प्रस्ताव २००९ साली पुढे आला. तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी हा प्रस्ताव मांडला. विद्यापीठ अनुदान आयोग त्याच्या उद्दिष्टांमध्ये अयशस्वी होत असल्याने तो खालसा करण्यात यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

### आयोग नव्हे परिषद!

आयोगाची जागा आता परिषद घेणार आहे. तिची रचना कशी असावी याचाही प्राथमिक आराखडा तयार आहे. त्या नुसार, या परिषदेमध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि १२ सदस्य असतील. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये एकात्मिक विकास साधला जावा आणि चांगले काम करणा-या शिक्षण संस्था, विद्यापीठांना अधिक स्वायत्तता द्यावी व त्यातून उच्च शिक्षणाचा संशोधनासह सर्व क्षेत्रांत चांगला विकास घडवून आणता यावा या दृष्टीने हे पाउल उचलण्यात आले असल्याची भूमिका केंद्र शासनाने मांडलेली आहे. उच्च शिक्षणाची आस बाळगून असणा-या तरुणांना उच्च शिक्षणातील उत्तमोत्तम संधी प्राप्त करून द्याव्यात, संशोधनाला प्रोत्साहन देऊन नवनवीन कल्पना, विचार आणि नवे प्रयोग यांना चालना मिळावी व मुख्यतः उच्च शिक्षण सर्वांना परवडेल अशा पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी जे जे करावे लागेल ते ते करावे, ही भूमिका या नवीन रचनेमागे आहे. देशातील विद्यापीठे ही येणा-या काळात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये उत्तमोत्तम संशोधन करणारी संशोधन संकुले बनावीत यासाठी पावले उचलणे, शिक्षणामध्ये चांगली मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे, गरीब परंतु हुशार व गुणवत्ता असणा-या विद्यार्थ्यांनाही त्यांच्या आवडीच्या विषयांमध्ये शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांची सर्वांगीण पात्रता वाढवणे, शिक्षकांची कमतरता व उपलब्धता या समस्यांचा मागोवा घेऊन त्यातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करणे ही उद्दिष्टेही या धडपडीमागे आहे, असेही प्रतिपादन केले जाते.

### उच्च शिक्षणातील नव्या बदलांचे स्वरूप

उच्च शिक्षणाची दिशा आणि त्याची धोरणे ठरवणा-या या परिषदेच्या माध्यमातून एक सुनियोजित आराखडा राष्ट्रीय स्तरावर तयार करण्यात आला. या विषयासंदर्भात सर्वसामान्य नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी संबंधित विधेयकही केंद्र शासनाने लोकमानसाच्या पुढ्यात आणले. शिक्षणविश्वातील जाणकारांनी, धुरिणांनी, अभ्यासकांनी त्यावर विचार करून त्यांची मतमतांतरे मांडावीत, त्या नुसार त्यात आवश्यक सुधारणा करून मग त्याची अमलबजावणी करावी, अशी त्या मागची भूमिका आहे.



सद्यःस्थितीत वैद्यकीय आणि कृषी या दोन क्षेत्रांवरील नियमन वगळता अन्य सर्व क्षेत्रे आणि संस्था केंद्रशासन आणि राज्यशासनाच्या कायद्याच्या अखत्यारित येतील, असा विचार आहे. या नव्या प्रस्तावित विधेयकामध्ये शैक्षणिक कार्यवाही आणि अनुदान देणे या दोन्ही विषयांमध्ये सुस्पष्ट असे दोन भाग केले जाणार आहेत. या पूर्वीच्या प्रस्थापित व्यवस्थेमध्ये बदल करून बहुतांश महत्त्वाचे अधिकार केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे एकवटणार आहेत. शैक्षणिक क्षेत्रामध्ये ज्या सुधारणा घडवून आणायच्या आहेत, त्यामध्ये, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार करणे, ते सर्वदूर घेऊन जाणे यावर परिषदेचा भर असेल. त्या शिवाय, शिक्षणाचा दर्जा टिकवून धरणे, उच्च शिक्षण देणा-या संस्थांना स्वायत्तता पदरात पाडून घेण्यासाठी प्रवृत्त करणे, शिक्षणामध्ये समग्र आणि एकात्मिक व्यापक प्रगती होईल यासाठी विशेषत्वाने प्रयत्न करणे आणि जागतिक स्तरावर आपले नाव झळकण्यासाठी संशोधनावर भर देणे या गोष्टी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक ठरणार आहे, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे मत आहे.

### का घसरत गेला शिक्षणाचा दर्जा?

उच्च शिक्षणाच्या प्रस्थापित व्यवस्थेमध्ये शिक्षणाच्या शाखा विस्तारत गेल्या. त्या नुसार त्यांचे नियमन करणारी बहुस्तरीय, बहुकेंद्री संस्थात्मक रचना अस्तित्वात आली. त्यातून वरकरणी प्रश्न सुटल्यासारखे वाटत असले तरीही उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील गुंतागुंत वाढतच गेली. एका बाजूला शिक्षणसंस्थांची सर्वच आघाड्यांवर बेसुमार पद्धतीने वाढ होत चालली होती. पैसे मिळवण्याचा एक उत्तम मार्ग म्हणून अनेकांनी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, संगणक अशा विषयांमध्ये शिक्षण देणा-या अनेक संस्था सुरू केल्या. त्यातून त्यांचे पेवच फुटले आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अपेक्षा व शैक्षणिक गुणवत्ता यांचे एक व्यस्त प्रमाण निर्माण झाले. बाहेरच्या जगात श्रमांच्या बाजारातील बदलती मागणी आणि विद्यार्थ्यांना मिळणारे कामचलाऊ शिक्षण यांच्यादरम्यानची तफावत वाढत चालली असल्याचे लक्षात येऊ लागले. या सा-यांचे सुयोग्य पद्धतीने नियंत्रण करणे ही बहुस्तरीय आणि बहुकेंद्री नियामक व्यवस्थेच्या आवाक्याबाहेरची गोष्ट होऊन बसली आणि त्यातून परिस्थिती अधिकच चिघळत गेली.

भारतात पहिली तीन विद्यापीठे स्थापन झाली १८५७ साली आणि विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना व त्या संबंधीचे विधेयक पारित झाले ते त्या नंतर जवळपास शतकभराने, म्हणजे, १९५६ मध्ये. मात्र, उच्च शिक्षणाच्या क्षेत्राचे नियंत्रण-नियमन करणा-या संस्था ख-या अर्थाने वाढल्या त्या १९८० सालानंतर. उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण यामुळे तर त्यात आणखीनच वाढ झाली. याच काळात खासगी विद्यापीठे आणि खासगी शिक्षणसंस्था मोठ्या प्रमाणावर उदयास आल्या आणि व्यावसायिक स्तरावरच्या समित्यांनीही स्वतःला नियामक संस्था म्हणवून घेण्यास प्रारंभ केला. शिक्षणसंस्थांची बेसुमार वाढ, मोठ्या प्रमाणावर सुरू झालेल्या खासगी शिक्षण संस्था आणि राजकारणाचा वाढता प्रभाव या गोष्टींमुळे आपल्या देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा यथावकाश खालावत गेला, असे या क्षेत्रातील जाणकारांचे निरीक्षण सांगते.

शैक्षणिक कार्यवाहीचे सारे अधिकार परिषदेला देण्याचे धोरण प्रस्तावित विधेयकामध्ये नमूद केलेले असले तरीही सद्यस्थितीत अस्तित्वात असणा-या व्यावसायिक संस्थात्मक व्यवस्थेचे करायचे काय, हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरितच आहे. आयोगासारखी संस्था एकदम खालसा करण्यापूर्वी शासनाने किमान या विषयावर व्यापक स्तरावर औरसचौरस चर्चा तरी घडवून आणायला हवी होती, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. अनुदान देण्याचे आजवर आयोगाकडे असलेले अधिकार आता केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे जाणार असल्याने विद्यापीठांना अनुदान थेट केंद्रीय मंत्रालयातून मिळेल. परंतु यामुळे देशातील विद्यापीठे ही शासनाचे विभाग बनून जातील अशी चिंता सध्या शिक्षणक्षेत्रातून व्यक्त केली जाते आहे. अर्थात, याचा निर्णय अद्याप झालेला नाही अशी सावध भूमिका केद्र शासनाने घेतलेली आहे. 'ऑल इंडिया फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन' (एआय-फुक्टो) या संघटनेनेही या निर्णयाला विरोध दर्शवला आहे.

या शिवाय उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात जी आणखी महत्त्वाची पावले उचलली जात आहेत ती सुद्धा महत्त्वाची आहेत. केंद्रीय स्तरावर 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क' (एनआयआरएफ) प्रस्थापित करण्यात



आले आहे. महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचे मानांकन ठरवण्यासाठी शासनाचे पूर्ण पाठबळ असणारी ही देशातील पहिली संस्था असणार आहे. महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचे मानांकन निश्चित झाल्यानंतर अनुदानाची रचना करायलाही त्या मानांकनाचा उपयोग होणार आहे. भविष्यात महाविद्यालये आणि विद्यापीठे यांना आर्थिक पाठबळ देताना त्या मानांकनाचा संदर्भ घेण्याचा प्रस्तावही मसुद्यात नमूद करण्यात आलेला आहे.

**'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' आणि 'ग्रेडेड ऑटॉनॉमी' प्रकल्प**

विद्यापीठ अनुदान आयोगाला सुमारे ५० वर्षांहून अधिक काळ मिळाला. मात्र, ज्या मोठ्या प्रमाणात विद्यापीठांची संख्या वाढत गेली, अनुदानाचे प्रमाण वाढत गेले. त्या तुलनेत ज्ञानाचा विस्तार मात्र अपेक्षित रीतीने होऊ शकला नाही. त्यामुळे आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होऊ लागले होते. याला काही पर्याय असू शकतो का, वा या परिस्थितीत काय सुधारणा होऊ शकतात याचा विचार गेल्या दशकभरात केंद्रीय स्तरावर सत्तापट पेललेल्या विविध पक्षांच्या शासनांनी सुरू केलेला होता. त्या पार्श्वभूमीवर परिषदेने शिक्षणाची गुणवत्ता उंचवण्यावर भर द्यावा आणि शिक्षण संस्था, विद्यापीठांना जी मदत करायची आहे ते काम केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे सोपवून द्यावे असा केंद्राचा विचार दिसतो.

'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' म्हणून अगदी अलीकडेच तीन सार्वजनिक आणि तीन खासगी अशा एकंदर सहा संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील पहिल्या तीनमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स आणि मुंबई व दिल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांचा समावेश आहे. तर, खासगी क्षेत्रातील उर्वरित तीनमध्ये बिट्स् पिलानी, रिलायन्स जिओ इन्स्टिट्यूट आणि मणिपाल ॲकेडमी ऑफ हायर एज्युकेशन यांचा समावेश आहे. मात्र, या निवडीनंतरही त्यावर बरेच आक्षेप घेतले जात आहेत. त्यातील प्रमुख एक आक्षेप म्हणजे यात आपल्या देशातील एकही विद्यापीठ का नाही, हा. अधिक स्वायत्तता आणि आर्थिक पाठबळ हा मुख्य हेतू असेल तर 'आयआयटी'सारख्या संस्थांनी त्यांची कामगिरी कायमच उंच ठेवलेली आहे व त्यांच्याकडे साधनांचीही कमतरता नाही. त्यामुळे सामाजिक शास्त्रे, अर्थशास्त्र,

मानव्यविद्या यांचा अभ्यास करणा-या एका तरी विद्यापीठाचा यात विचार होणे गरजेचे होते, असा एक मतप्रवाह या संदर्भात प्रकर्षाने मांडण्यात आला. कोणताही नवा बदल जर विचारपूर्वक केलेला असेल आणि त्याला नियोजनबद्ध प्रयत्नांची व प्रभावी अमलबजावणीची जोड दिलेली असेल तर निश्चितपणे त्यातून चांगलेच साकारेल. देशातील उच्च शिक्षणाचे क्षेत्र हे सध्या अशाच एका महत्त्वपूर्ण स्थित्यंतराच्या टप्प्यावर उभे आहे.

आगामी काळामध्ये खूप सारे मंथन घडेल. त्यामध्ये अनेकविध बदलसुद्धा होतील कदाचित. परंतु, या सा-या बदलांच्या प्रक्रियेमध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अस्तित्वात आलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्थान व महत्त्व मात्र संपुष्टात येईल, हे आता उघड झालेले आहे. त्यामुळे, भूतकाळात ज्या चुका झाल्या असतील त्यांची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता बाळगत उच्च शिक्षण क्षेत्राला अधिक उंचावर नेण्यासाठी प्रयत्न करणेच गरजेचे आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या जागतिक संकल्पना रूजवणे, नवे विचारपीठ तयार करणे, संशोधन विकासाला चालना देणे आणि देशातील शिक्षणसंस्था व विद्यापीठांचा दर्जा उंचावणे या ध्येयाने उचलली जात असलेली पावले येत्या काळात चांगलाच बदल घडवतील, असा विश्वास बाळगायला काय हरकत आहे ? ■■


**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**






# शंभरी ओलांडलेली खाकी...!

खाकी वर्दी म्हटले की डोळ्यांसमोर पहिला उभा राहतो पोलीस. खाकी वर्दीचा दरारा आहेच तसा! काही रंगांचेही विशेष असतात. ते काही काही गोष्टींशी पक्के जोडलेले असतात. उदाहरणार्थ, 'एस.टी.' म्हटले, की आपण चट्कन म्हणतो 'लाल डब्बा'. कारण, लाल रंगाची बस म्हणजे एस.टी. असे समीकरण जणू होऊ न गेलेले आहे. पांढरा डगला म्हणजे डॉक्टर आणि काळा डगला म्हणजे वकील, तसे खाकी म्हटले की पोलीस! स्वातंत्र्यप्राप्तीपासून आपण या एकाच रंगामध्ये पोलिसांना बघत आलो आहोत. पण हा खाकी रंग केवळ पोलिसांचीच खूण नव्हता तर त्याचे खरे नाते आहे शौर्याशी... रणांगणाशी! अत्यंत मळखाऊ रंग ही त्याची खासियत असल्याने हा रंग सैन्याशी जोडला गेला. हा खाकी रंग म्हणजे अस्सल भारतीय रंग. त्याचे मूळ भारतात आहे आणि ब्रिटिशांनी तो स्वीकारला त्याचे कारणही तसेच आहे. भारतात ब्रिटिश आले तेव्हा चकचकीत रंगीत वेगळ्या रंगाचे गणवेष होते त्यांचे. पण भारतातल्या धुळीपुढे ते टिकेनात. तेव्हा, मातीत मिसळून जाणारा आणि मातीचाच रंग ल्यालेला खाकी रंग सैन्यदलासाठी गणवेश म्हणून पुढे आला. या सगळ्या इतिहासाला आता १००हून अधिक वर्षे उलटून गेली आहेत. पण हा रंग सैन्याला आणि पुढे पोलीसदलाला चिकटला तो चिकटलाच. खाकी वर्दीचा रंग बदलण्याच्या चर्चाही मधल्या काळात जोर धरत होत्या हे खरे. तो जेव्हा बदलायचा तेव्हा बदलेल... पण या खाकी रंगाच्या इतिहासात डोकावणे मोठे रंजक ठरावे.

---

**गणवेष आणि खाकी रंगाचे एक विशेष नाते आहे. सैन्यापासून ते पुढे पोलिसदल आणि शासकीय सेवेतील कर्मचा-यांपर्यंत हा रंग आपल्या देशातील व्यवस्थेत पसरत गेला त्याला एक इतिहास आहे. या इतिहासाचा मागोवा घेताना लक्षात येते की गेली १०० हून अधिक वर्षे हा रंग जगभरात आपले स्थान टिकवून आणि आपला ठसा उमटवून राहिलेला आहे. खाकी वर्दीच्या शतकभराहून अधिक काळातील प्रवासाचा हा एक रोचक मागोवा...**

**‘खाकी’ शब्दाचा अर्थ काय?**

खाकी हा मूळचा पर्शियन भाषेतील शब्द. त्याचा अर्थ ‘धूळ’ अथवा ‘माती’. या रंगाचा वापर सैन्यदलात मोठ्या प्रमाणावर होण्यामागे हेच मोठे कारण होते. अफगाणिस्तानच्या युद्धामध्ये स्थानिकांच्या विरोधात लढताना ब्रिटिशांचे पारंपरिक गणवेश पटकन नजरेत भरत. परिणामी, आपले सैनिक त्यांमुळे टिपायला सोपे लक्ष्य बनत आहेत, हे त्यांच्या लक्षात आले. लालसर रंगाचा गणवेश चमकदार आणि प्रभाव टाकण्यासाठी चांगला होता. परंतु, समोरासमोरच्या युद्धात तो रंग उपयोगी नव्हता. त्यामुळेच प्रामुख्याने १९ व्या शतकाच्या सुरुवातीला एक मोठा बदल होऊ लागला.

खरे तर खाकी हा रंग काही आपल्याला आवडावा, आकर्षित करावा, लोभस वाटावा असा रंग अजिबात नाही. तरीही या रंगाने इतिहासावर स्वतःची अशी वेगळी छाप उमटवलेली आहे हे विशेष. केवळ ब्रिटिशांनीच हा रंग स्वीकारला असे नाही तर, युद्ध सुरू होण्यापूर्वी जर्मनांनाही हा खाकी रंग आवडलेला होता. उष्ण कटिबंधीय प्रदेशात लढाईला गेल्यानंतर त्यांचा पारंपरिक राखाडी रंगांचा गणवेष किती धोकादायक ठरतो हे त्यांनी अनुभवलेले होते. फ्रेंचांवरसुद्धा या खाकीचा विशेष प्रभाव पडला असल्याची इतिहासात नोंद आहे. १९३५ साली टाइम्स ऑफ इंडियाने या संदर्भात लिहिताना म्हटले की, चमकदार निळ्या रंगाचा गणवेश असणा-या फ्रेंच सैन्यालाही खाकी रंगाने भुरळ पाडली होती. १८९८ मध्ये स्पॅनिश-अमेरिकी युद्धामध्ये खाकी रंगाचा प्रभाव किती महत्त्वाचा आहे हे अमेरिकींनी स्वतः अनुभवलेले होते. परंतु महायुद्धाच्या प्रभावानंतर मात्र अमेरिकी सैनिकांनी खाकी रंगाचा वापर अधिक प्रमाणात सुरू केला.

**खाकीचा पहिलावहिला वापर**

खाकी या रंगाचा अधिकृत स्वीकार झाला तो खरे तर तब्बल १७२ वर्षांपूर्वी. भारतामध्ये सैन्याचा गणवेष म्हणून या खाकी वर्दीची सुरुवात केली ती लेफ्टनंट (पुढे ते लेफ्टनंट जनरल झाले) ल्युम्सडेन यांनी. राणीचे संरक्षक म्हणून निवडक सैनिकांना हे गणवेष देण्यात आले होते. त्या वेळी सैन्यदलामध्ये असणारा जो पारंपरिक अर्ध-युरोपीय गणवेष होता त्यापेक्षा हा खाकी रंग सीमेवरील लोकांशी संवाद साधण्यात महत्त्वाची भूमिका



बजावू शकेल असा त्यांचा अंदाज होता. याच काळात पंजाब फ्रंटियरच्या तुकडीनेही खाकी रंगाच्या गणवेषाला पसंती दर्शवली होती. सैन्यदलात त्या काळी किमान एक वर्षभर काम केल्याशिवाय त्याला अधिकृत गणवेष दिलाच जात नसे. शिपाई म्हणून रीतसर भरती झाल्यानंतर एक पायघोळ पायजमा आणि कापूस भरलेली एक पगडी प्रत्येकाला दिली जात असे. थंडीच्या दिवसांमध्ये मेंढीच्या लोकरीपासून बनवलेले जर्किन आणि कापूस भरलेली जॅकेट्स् दिली जात असत. स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून ते रंगवले जात (त्याला ‘माझरी’ असे म्हणत). त्यामुळे त्याचा असणारा मूळ रंग जाऊन राखाडी रंग प्राप्त होत असे. स्थानिक व देशादेशांमधील युद्धे सातत्याने सुरूच होती. त्या पार्श्वभूमीवर, स्थानिक आदिवासींनी देशी पद्धतीचे एक नव्या प्रकारचे कापड तयार केले. चामड्याची जॅकेट्स् ही पारंपरिक माझरी पद्धतीने रंगवली जात नसत. त्यामुळे त्यातून एक मातकट पिवळा रंग त्यावर उतरत असे. हेच मूळ होते खाकी गणवेशाचे.

**खाकी रंगाचा रंजक प्रवास**

उत्तर अमेरिकेतील एका अंतर्गत युद्धामध्ये सैन्यदलाच्या दोन तुकड्यांनी तपकिरी रंगाचे कोट घातले होते त्यामुळे जंगलात झाडांच्या आड लपणे त्यांना सहजशक्य बनत असे. रायफलधारी सैनिकांसाठी पुढे गडद हिरव्या रंगाचा पोषाख आला आणि तो पुष्कळ काळ टिकून राहिला. मात्र, भारतातील खडकाळ भागासाठी, डोंगररांगांसाठी आणि मैदानी प्रदेशासाठी खाकी हाच उत्तम पर्याय ठरला. पुढे पंजाब फ्रंटियर फोर्सनेसुद्धा हा खाकी रंगाचा गणवेश १९५७-५८ मध्ये स्वीकारला होता. त्या काळात काही ब्रिटिश सैनिकी तुकड्यांमध्ये पांढरा रंग मातकट रंगात रंगवण्याची प्रथा होती. मधल्या काही काळात हा खाकी रंग पुन्हा वापरातून दूर झाला होता. १८३९मध्ये लाल रंगाचे पोषाख घालून सरहद्दीवरून निघालेल्या ब्रिटिश सैनिक तुकड्यांनी चांगलाच धडा घेतला होता. त्या नंतर हा रंग पुन्हा एकदा दिसला तो १८७८-८०मध्ये लढल्या गेलेल्या अफगाण युद्धात. त्या वेळी सर्व सैनिक तुकड्यांनी खाकी रंगाचे कपडे घातलेले होते. अफगाण युद्धानंतर मात्र हा खाकी रंग भारतात असलेल्या ब्रिटिशांनी अधिकृतपणे लष्करी पेशाचा पोषाख म्हणून स्वीकारला. चहा, कॉफी, चिखल आणि

रशश्याचा मसाला या सा-यांचा वापर करून त्यांच्या मिश्रणातून हा खाकी रंग साकारला जात होता. प्रत्येक तुकडीची आपला पोषाख रंगवण्याची पद्धत वेगवेगळी असायची. त्यात नवनवीन प्रयोगसुद्धा होत राहायचे. कपडा झटपट रंगवण्याची प्रक्रिया १८८४ मध्ये मँचेस्टरमध्ये शोधून काढण्यात आली आणि विशेष म्हणजे याचे त्यांनी पेटंटसुद्धा घेतले. परंतु, भारतात त्याचा स्वीकार व्हायला काही काळ जावा लागला. राणीचे खासगी सुरक्षा पथक १९०४ सालापर्यंत त्यांच्याच पद्धतीने रंगकाम करून खाकी कपडे वापरत होते.

रायफल हे नवे शस्त्र युद्धामध्ये आले आणि त्याने युद्धाची समीकरणेच बदलली. कारण, त्यातून युद्धतंत्रात आली कमालीची अचूकता. त्यामुळे अफगाणिस्तानविरुद्धच्या युद्धामध्ये ब्रिटिश अधिकारी हॅरी ल्युम्सडेन आणि विल्यम हॉडसन यांनी एक वेगळा प्रयोग करून पाहिला. तो काळ होता १८४६-४७ चा. आपल्या सैनिक तुकड्या नैसर्गिक रंगांशी आणि परिस्थितीशी जुळवून घेणा-या कशा होतील, यावर त्यांनी भर दिला. त्या नुसार, त्यांनी त्यांचे गणवेश हे चक्क चहामध्ये बुडवले. नंतर चिखल आणि रशश्याचा मसाला यांचासुद्धा वापर करून झाला. काही भाज्यांचाही वापर केला होता बहुधा. काही का असेना, पण, या सा-यांच्या मिश्रणातून जो काही रंग तयार झाला तोच हा खाकी. असे वेशांतर केल्यानंतर ल्युम्सडेनची सैनिकी तुकडी लवकरच भारतातील ब्रिटिश सैन्यदलातील सर्वांत यशस्वी आणि आदराचे स्थान बनली. १८५७ च्या सुरुवातीला खाकी वर्दीतल्या सैन्याचा प्रभाव काय असतो याचे थेट दर्शनच ल्युम्सडेनचा वरिष्ठ असलेल्या हॉडसनला घडले. दिल्लीमध्ये बहादूरशहाच्या विरोधात लढण्यासाठी हे खाकी वर्दीतले सैनिकच धावून आले. त्याचाच परिणाम होता कदाचित, पण १८५८ सालातील सप्टेंबरमध्ये ब्रिटिशांच्या भारतातील सैन्यदलाच्या प्रमुखांनी अधिकृतपणे घोषणा केली की, युरोपीय सैनिकांनी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये खाकी गणवेशाचा वापर करावा. त्यामुळे औपचारिक समारंभामध्ये ब्रिटिश सैनिकांचा गणवेश हा नेहमीसारखाच राहिला तरी नियमित वापरासाठी खाकीचा वापर असा सुरू झाला. १८८० चा काळ महत्त्वाचा ठरला कारण भारतात आणि परदेशातही खाकीचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला.



भारतीय सैन्यामधील प्रत्येक तिसरा सैनिक हा खाकी वापरत असल्याचे वृत्त १८८३ मध्ये लंडनच्या 'डेली न्यूज'ने दिले. साधारण याच काळाच्या दरम्यान इजिप्तमध्ये ब्रिटिशांनी जे सैन्य पाठवले होते ते खाकी रंगाचा गणवेष घालून गेले होते. या गणवेषावरचा खर्च अधिक होत असला तरीही इजिप्तमध्ये हा अतिशय योग्य गणवेष आहे, असे पत्र तत्कालीन अधिका-यांनी पाठवले होते. इजिप्तमध्ये सातत्याने वाळूची वादळे येत असल्याने पांढ-या रंगाचा गणवेश हा चटकन दिसून येऊ शकतो आणि त्याचप्रमाणे तो लवकर मळतोसुद्धा. त्यामुळे, अशा वालुकामय प्रदेशात खाकीचा वेशच उत्तम असल्याचे मत तत्कालीन ब्रिटिश अधिका-यांनी पत्राद्वारे कळवल्याची इतिहासात नोंद आहे.

मात्र, हा खाकी रंग इतका लगेच काही स्वीकारार्ह झाला असे अजिबात नाही. त्यालाही विरोध झालाच. रिचर्ड होम्स या इतिहासकाराने त्यांच्या 'साहीब' या पुस्तकामध्ये असे लिहिले आहे की, ब्रिटिश सैनिकांना युद्धभूमीवर हा खाकी रंग सोयीचा वाटत असला तरीही दररोजच्या वापरासाठी खाकी गणवेशाला मात्र त्यांची पसंती नव्हती. अनेकजण तर दिवसा खाकी घालत परंतु रात्री त्यावर लाल रंगाचे जॅकेट घालत असत. गंमत म्हणजे, हा अंतर्विरोध इतका तीव्र होता की, टाइम्स ऑफ इंडियाच्या संदर्भानुसार, 'रॉयल स्कॉटिश फ्युसिलर्स' या नावाचे जे एक वृत्तपत्र सैन्यदलाच्या एका तुकडीमार्फत त्या काळी प्रकाशित केले जात असे त्यामध्ये, भारतात ब्रिटिश सैन्य काम करायला तयार का नाही याची कारणमीमांसा बघितली तर पहिल्या क्रमांकाचे कारण अर्थातच होते कमी मिळणारे वेतन. पण दुस-या क्रमांकावर होता खाकी रंगाचा गणवेष !

हे गणवेष घातल्यानंतर आजारी असल्यासारखे वाटते, ते अंगात परिधान केल्यानंतर स्वतःचीच लाज वाटते, असे या सैनिकांचे मत होते. विशेष म्हणजे, भारतातील उन्हाळा आणि आजार ही कारणेसुद्धा तिस-या क्रमांकावर होती. १८८४ सालापर्यंत खाकीला असणारा तो विरोध आणखी वाढत गेला आणि मग त्या नंतर औपचारिक वापरासाठी पांढरा रंगच वापरण्याचे पुन्हा निश्चित झाले. या मताचे अनेकजण असले तरी रणांगणावर लढणारे सैनिक मात्र त्यांच्या भूमिकेवर ठाम होते. खाकी निर्विवादपणे उपयुक्त

असा गणवेश होता. अवघड कामगिरी तडीस नेण्यासाठी, लपूनछपून नेमका वार करण्यासाठी, स्वतःची ओळख लपवून सुरक्षित राहण्यासाठी हा रंग फार उपयुक्त होता. १८८४ मध्ये जेव्हा सैनिकी तुकड्या बर्माला जाण्यासाठी निघाल्या तेव्हा ते सारे जण पुन्हा खाकी गणवेशातच होते. १८९९-१९०२ या दरम्यान झालेल्या दुस-या बोअर युद्धानंतर मात्र खाकीविषयीचे सारे अपसमज-गैरसमज दूर होऊन गेले. दक्षिण आफ्रिकेच्या अंतर्गत भागात लपूनछपून फिरताना हा रंग किती कमालीचा उपयोगी आहे याचे प्रत्यंतर सैन्याला आले. परंतु, एक नवीनच समस्या मग उद्‌भवली. ती म्हणजे, बोअर तुकड्यांमधील सैनिकांनीही खाकी रंगाचेच कपडे घातले ! १८५८ ते १९१८ सालापर्यंत खाकीचा प्रभाव असा राहिला. त्या नंतर झडले पहिले महायुद्ध. तो काळ होता १९१८चा. युरोपलाही या युद्धाच्या अखेरीस लोकसंख्या आणि अर्थव्यवस्था यांच्याबाबतीत मोठा फटका बसलेलाच होता. त्या काळी युरोपातील कपड्यांचे जे एकूण उत्पादन होत असे त्यातील ८० टक्के उत्पादन हे केवळ युद्धासाठी लागणा-या कपड्यांचेच होत होते. त्या वेळी हे उत्पादन अर्थातच सर्वस्वी खाकी नव्हते. त्यात काहीसे पिवळट तपकिरी रंगाचे कापड वापरले जात होते. मात्र, त्याचेही मूळ आशियातीलच होते.

पुढील काळात बदलत्या युद्धतंत्रामुळे खाकी रंग काहीसा मागे पडला. आशियायी देशांतील जंगलात फिरतानासुद्धा मळक्या खाकी रंगापेक्षाही जंगली हिरव्या रंगाला पसंती वाढू लागली. खाकीचा प्रभाव ओसरू लागला. एक पर्याय म्हणूनच केवळ त्या नंतरच्या काळात खाकी रंगाकडे पाहिले जाऊ लागले. सैनिकांच्या अंगावर शोभून दिसणारा हा खाकी रंग तेव्हापासून क्रमाने कमी कमी होत गेला. परंतु, मग त्याने हळूहळू नागरी जीवनात प्रवेश मिळवला. शासकीय सेवांमध्येही खाकी रंग उतरला आणि पोलीसदलाची तर ती ओळखच बनली. आजही या खाकी रंगाने त्याचे अस्तित्व अबाधित राखले आहे ते असे. ■■

**संदर्भ :** इकॉनॉमिक टाइम्स, १४ जुलै २०१८
न्यूयॉर्क टाइम्स, २२ मार्च १९८७



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **२००/ - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **३५० / - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **८०० /- रुपये** |

**संशोधन**

## मौखिक इतिहास संकलनाचा अनोखा प्रयोग...

**'मौखिक इतिहास', हे गतकालीन घटितांच्या दस्तऐवजीकरणाचे एक मौलिक साधन गणले जाते. इतिहाससंशोधनासाठी आणि लेखनासाठी आधारसाहित्य म्हणून वापरल्या जाणा-या अन्य अव्वल साधनांइतकी जरी या साधनाची विश्वासार्हता निरपवाद गणली जात नसली तरी या साधनस्त्रोताची मौलिकता सरसहा अमान्य कोणीच करत नाही. सनावळ्या व तारखांसारख्या अन्य अव्वल साधनांनिशी लिहिला जाणारा इतिहास सांगाड्यासारखा भासतो. मानवी स्मृतिमंजुषेमधून आठवणींच्या रू पाने झिरपणारा तपशील त्या सांगाड्यात भरला की तोच इतिहास जणू जिवंत होऊ न अवतरल्याचा अनुभव येतो. मौखिक इतिहासाच्या संकलनाचा असाच एक भव्य व अनोखा प्रयोग सध्या आकार घेतो आहे. त्याचा विषयही मोठा रंजक आणि तितकाच संवेदनशील आहे - १९४७ साली ब्रिटिशांनी घडवून आणलेली भारताची फाळणी ! या संशोधनामध्ये अग्रणी असणा-या गुनीता सिंह - भल्ला यांनी या विषयीचे मनोगत आणि त्याचा प्रवास अगदी अलिकडेच कथन केला. तब्बल १२० देशांमध्ये पसरलेल्या ४०० शहरांतील सहा हजारांहून अधिक कुटुंबांनी फाळणीचा तो सगळा कालखंड आठवणींद्वारे शब्दबद्ध केला आहे. यात ६०० स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे काम केले. ही सारी वाटचाल त्यांच्याच शब्दांत...**

---

दोन दशके झाली असतील त्या घटनेला आता. न्यूयॉर्कमधली एक पावसाळी दुपार. रस्त्याच्या कोप-यावर मी वडिलांची वाट पाहत उभी. अवघ्या १५ वर्षांची होते तेव्हा मी. व्हिज्युअल आर्ट्स्‌चे शिक्षण मी नुकतेच पूर्ण केले होते. अचानक जोराचा पाऊस आला. सोसाट्याचे वादळही आले. माझी तारांबळ उडाली. मी पळत पळतच एका दुकानात शिरले. पाऊस थांबण्याची वाट पाहत होते. इतक्यात माझे लक्ष भिंतीवरच्या एका चित्राने वेधून घेतले. एक चुरगळलेले पोस्टर सरळ करून फ्रेममध्ये बसवलेले होते.



२० डॉलर्स अशी किंमत त्याच्या एका कोप-यावर चिकटवलेली होती. हजारो लहान आकृत्या असलेली माणसे इंद्रधनुष्याचा आकार असलेल्या इमारतीत शिरतानाचे ते चित्र होते. तळाशी 'बिल्डिंग ऑफ रेनबो' असेही लिहिलेले दिसत होते...त्या चित्राने मी खूप प्रभावीत झाले. अक्षरशः हजारो माणसे त्यांच्यापेक्षा किती तरी आणि काही तरी भव्य असे साकारण्यासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे येत आहेत, ही कल्पनाच मला तेव्हा विलक्षण वाटली होती. ते चित्र मनातून कधीच गेले नाही.

मला खरोखरच कल्पनाही नव्हती की एका दशकानंतर तिथवरचे एक सर्वांत मोठे आव्हान माझ्यापुढे उभे राहणार आहे म्हणून. ते पेलण्याची प्रेरणा मला तेच चित्र देणार होते, हे तर माझ्या स्वप्नातही नव्हते तेव्हा. २००८ सालातील जून महिना होता तो. माझ्या डॉक्टरेटच्या प्रबंधासाठी विद्यावृत्ती मिळवण्याकरीता उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये जपानच्या टोकियो विद्यापीठात मी गेले होते. केवळ कुतुहलापोटी आणि काही नातेवाईक त्या शहरात असल्याने मी हिरोशिमाला भेट दिली. तिथे माझे आजोबा राहायचे. ब्रिटिशांच्या सैन्यामध्ये पतियाळा येथे ते कार्यरत होते. हिरोशिमावर जेव्हा अणुबॉम्ब टाकण्यात आला तेव्हा त्यांनी त्यांची श्रवणशक्ती गमावली होती. हिरोशिमा पीस मेमोरियलला मी भेट दिली तेव्हा माझ्या लेखी आयुष्याबाबतचा दृष्टिकोन संपूर्णतः बदलून टाकणारा असाच तो अनुभव होता. हिरोशिमावर अणुबॉम्ब टाकण्याच्या घटनेचे व्यक्तिगत अनुभव आणि त्या वेळच्या प्रत्यक्षदर्शींनी सांगितलेले थरारक अनुभव यांचा जबरदस्त प्रभाव माझ्या मनावर पडला. मी त्या विषयीची पुस्तके वाचली होती, चित्रपट पाहिलेले होते. परंतु, तो सारा अग्निकल्लोळ प्रत्यक्ष अनुभवलेले लोक त्याच्या स्मृती जागवत असताना त्याचा जो प्रभाव माझ्या मनावर पडला होता तितका प्रभाव अन्य कशाचाही नव्हता हे मला प्रकर्षाने जाणवले. त्यांच्या सा-या कहाण्या थक्क करणा-या होत्या, अस्वस्थ करणा-या होत्या.

नवीन कल्पना मनात रुजण्याचा तोच क्षण होता. भारताच्या फाळणीच्या कथा मी अनेकांकडून ऐकलेल्या होत्या आणि फाळणीदरम्यान लाखो लोक बेघर झाले होते, हा इतिहासही मला ज्ञात होता. परंतु, तरीही माझ्या शाळेच्या अभ्यासाच्या पुस्तकात हा इतिहास दिलेला नव्हता. हिरोशिमातील

तो क्षण माझ्यावर खूप मोठा प्रभाव टाकून गेला आणि त्या वेळी मला असे अगदी आतून वाटले की माझ्या आजीसारखे असंख्य लोक असतील ज्यांनी फाळणीच्या वेळी जे जे भोगले त्याच्या कहाण्या जगासमोर सांगायला हव्यात. त्यांद्वारेच, कदाचित। फाळणीची वेदना काय होती हे आपल्याला यथार्थपणे समजू शकेल. या विषयी आधी अशा स्वरूपाचे काही प्रयत्न झाले आहेत का, याचा मी पुढे शोध घेतला. परंतु, फाळणीसंदर्भात लोकांनी केलेल्या नोंदी, आठवणी या विषयी काहीही संशोधन झालेले नसल्याचे माझ्या ध्यानात आले. फाळणीसारखी कटू स्मृती विस्मृतीत जावी अशीच जणू परिस्थिती होती. मग, २००९ सालातील हिवाळ्यात मी त्या दिशेने पावले उचलायला सुरुवात केली. माझ्या कॅमकॉर्डरवर आठवणी ध्वनिमुद्रित करायला मी प्रारंभ केला. त्यासाठी मी पहिल्यांदा भेट दिली पंजाबमधील फरिदकोट येथे. बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात मी पोस्ट डॉक्टरल संशोधन करत होते. त्याच जूनमध्ये माझ्या आजीच्या पिढीतील एक शेवटचे सदस्य- तिचे बंधू हरावतार सोधी - हे वयाच्या नव्वदीत हे जग सोडून गेले. त्यांच्या देहावसानापूर्वी काही काळ अगोदरच मी त्यांना भेटून आले होते. परंतु, त्यांच्या आठवणी ध्वनिमुद्रित करण्याची काहीही सुविधा तेव्हा मजजवळ नव्हती.

हे नुकसान माझ्यावर फार मोठा आघात करून गेले. कारण त्यांच्या निधनामुळे केवळ आमच्या कुटुंबाचेच नुकसान झाले नव्हते तर त्यांच्यासोबत ते फाळणीच्या अनंत आठवणी घेऊन गेले होते. आता, जंग जंग पछाडले तरी त्या कोठेही मिळणार नव्हत्या. त्या वेळी मला ही जाणीव झाली की हे काम एकट्यादुकट्याने करण्यासारखे अजिबात नाही. असे शब्दशः हजारो, लाखो लोक विद्यमान असतील की ज्यांच्याजवळ १९४७ सालातील फाळणीच्या विविध आठवणींचा खजिना गवसेल. निदान तशी शक्यता तरी आहेच. त्या आठवणी संकलित करण्यासाठी संघटित प्रयत्न आणि कठोर परिश्रम करावे लागतील आणि या दरम्यान, मुख्य म्हणजे, आपली स्पर्धा असणार आहे ती वेळेशी, याचा मला एकदम साक्षात्कार झाला. कारण या आठवणी सांगू शकणा-या व्यक्तींचे वाढते वय ही मोठीच चिंतेची बाब होती. हा विचार डोक्यात घोळत असतानाच माझ्या मनात ते खूप वर्षांपूर्वी



पाहिलेले चित्र पुन्हा एकदा लख्खपणे डोळ्यासमोर आले आणि काय करायचे याचा एक सुस्पष्ट आलेखच जणू माझ्या दृष्टिसमोर तयार झाला. आजच्या आधुनिक युगातील एक संकल्पना माझ्या मदतीला धावून आली- - क्राउडसोर्सिंग ! २०१० साली त्यांबाबत मग गांभीर्याने विचार सुरू झाला. हजारो हात एकत्र आले तरच हे काम साकारू शकेल, हे मला त्या वेळी मनोमन पटले. मला आता काहीही करून या फाळणीच्या आठवणी एकत्र करायच्या हो्त्या. त्यासाठी मी कोणतीही किंमत मोजायला तयार होते. माझी भौतिकशास्त्रातील तिथवरची कामगिरी, माझे व्यक्तिगत आयुष्य हे सारे काही मी या एका गोष्टीसाठी पणाला लावलेले होते. अखेर, फाळणीच्या संबंधातील आठवणी, कहाण्या शोधून संकलित करण्याच्या कामाला मी २०१३ साली संपूर्णतः वाहून घेतले. आठवणींचा शोध जगभरात घेण्यात मी माझा सर्व वेळ घालवू लागले. त्या सा-या खटाटोपाचा मग सोशल मीडियावरून आम्ही प्रसार सुरू केला आणि त्याद्वारे प्रेरणा घेऊन अनेक ठिकाणच्या अनेकजणांनी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या आठवणी ध्वनिमुद्रित करायला सुरुवात केली. जगभरातल्या कानाकोप-यातून मग तपशील हाती येऊ लागला.

फाळणीनंतर असंख्य लोक वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेले होते. जिथून कधी अपेक्षाही केलेली नव्हती अशा ठिकाणांहून फाळणीच्या कहाण्या हाती येऊ लागल्या. पूर्व आणि पश्चिम बंगालप्रमाणेच, पूर्व आणि पश्चिम पंजाबमधूनही त्या आल्या. धार्मिक संघर्षाचा एक समान धागा या आठवणींतून समोर आला. प्रत्येक गट हा जसा हिंसाचाराचा बळी ठरला होता त्याचप्रमाणे हिंसाचार घडवणाराही ठरला होता, हे इहिसातील एक विदारक चित्र या आठवणींच्या माध्यमातून समोर उभरत होते. अतिशय अनपेक्षित अशा कथाही संग्रही येऊ लागल्या. इस्रायली ज्यू समाजातील एकाने तर अशी आठवण सांगितली की, १९४७ मध्ये त्यांना कराचीहून पुण्याला आणले गेले आणि त्या नंतर इस्त्रायलची उभारणी होत असताना त्या कामासाठी त्यांना इस्त्रायलमध्ये धाडण्यात आले. भारत-पाकिस्तान फाळणी आणि इस्त्रायल-पॅलेस्टाईन फाळणीमधील हे वेगळ्या अर्थाने जुळणारे धागे अनेक प्रकारच्या आठवणींतून समोर येत राहिले.

जगातील एका मोठ्या फाळणीच्या आठवणी जाणून घेण्याची उत्सुकता केवळ मला एकटीलाच नव्हती, या वास्तवाचा साक्षात्कार मला या सगळ्या उपक्रमादरम्यान घडला. मौखिक स्वरू पात ध्वनिमुद्रित केलेला, सहा हजारांहून अधिक लोकांनी सांगितलेला इतिहास एव्हाना संकलित झालेला होता. काळजीपूर्वक ध्वनिमुद्रित केलेल्या त्या व्हिडिओमध्ये किती तरी तासांचे ध्वनिमुद्रण झालेले दिसून येत होते. हा अर्थातच काही लहानसहान खजिना नव्हता. मुलाखतकर्त्यांनीही त्यासाठी घेतलेली मेहनत दिसून येत होती. भारतातील काही जाणकार अभ्यासकांचे या मोहिमेकडे लक्ष वेधले गेले. या मोहिमेला अधिक गती देण्यासाठी त्यांनी विद्यापीठीय संशोधनाचे प्रकल्प प्रवर्तित करण्याबरोबरच अशा कहाण्या ध्वनिमुद्रित करणा-या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केली. त्यातून त्यांचा उत्साह आणखी दुणावला.

आठवणींच्या खजिन्याचा तो प्रवाह मग सातत्याने वाहतच राहिला. अंदमान-निकोबार द्वीपसमूहातील सुंदरबन येथून, काश्मीरमधून, अफगाणिस्तानच्या सीमेवरून, सुदूर नागालँडमधून... अशा विविध भागांतून आठवणी संकलित होत गेल्या. आमच्या कल्पनेपेक्षाही किती तरी अधिक रसरशीत, रोचक आणि तितक्याच धक्कादायक आठवणी अगणित लोकांनी पाठवल्या. स्मृतिमंजुषेमध्ये साठवलेली फाळणीची अनंत दृश्ये, त्या वेळी एकमेकांना केलेली मदत, त्या दरम्यान झालेले अन्याय, अत्याचार, त्या वेळचे घाणेरडे राजकारण, गढूळलेली संस्कृती आणि सामाजिक परिस्थिती, तेव्हाची शहरे, तिथली आर्थिक परिस्थिती... अशांसारख्या अनंत बाबींचा त्यात समावेश होता.

इतिहासाच्या विटाल पटलावरील रिकाम्या जागांमध्ये राजकारण्यांनी त्यांना सोयीचा असणारा इतिहास भरण्यापेक्षा आपणच आपल्या इतिहासाला उजाळा देऊ न गतकाल समजून घेणे केव्हाही हितकारकच ठरत असते. हे संशोधन म्हणजे त्याचेच बोलके उदाहरण होय !

**संदर्भ :** (www.1947partitionarchive.com)

**- द हिंदू, वाइड अँगल, २२ जुलै २१०८**

■■





## राजाश्रयाकडून लोकाश्रयाकडे...

भारतीय कलेची सर्वांगीण चर्चा करताना इतिहासातील महत्त्वाच्या स्थित्यंतरांचा मागोवा घेणे आवश्यक आहे. प्राचीन भारतीय संस्कृती आजच्याइतकी प्रादेशिक आणि राजकीय सीमांनी बांधली गेलेली नव्हती. कला, मग ती कोणतीही असो, तिला भक्कम पाठबळ मिळाले, तर ती उत्तम रीतीने बहरते, तिचा विकास होतो हे आपल्याला ज्ञात आहे. भारताच्या विविध प्रांतांतील राजे-महाराजे, त्यांचे महाल, राजवाडे ही सारी कलेला आश्रय देणारी, जपणारी केंद्रे होती. राजाश्रयामुळे कला विकसित होत राहिल्या. त्यांना आधार मिळत होता त्याचप्रमाणे सन्मानही मिळत होता. पण काळ जसा बदलत गेला त्या नुसार संदर्भ बदलत गेले. कलांचा राजाश्रय कमी होत गेला. गेल्या ५० वर्षांमध्ये (अतिशय मोजक्याच असणा-या परंतु), संस्कृतीविषयी आंतरिक प्रेम, आस्था आणि जिव्हाळा जपणा-या लोकांनी या कलांचे पुनरूज्जीवन करण्याचे प्रयत्न त्यांच्या त्यांच्या पातळ्यांवर सुरू केलेले दिसून येतात. जे राजमहाल पूर्वी बंद पडले होते ते सामान्यजनांसाठी यातून पुन्हा एकदा खुले झाले. खुले होत आहेत. त्यांद्वारे, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळाली आणि पुन्हा एकदा त्या राजवाड्यांच्या परिसरात कला बहरताना दिसू लागल्या आहेत.

### ७०० वर्षापूर्वीच्या किल्ल्यात कलादर्शन

उदाहरणादाखल सांगायचे झाले तर, निमराणा नावाचा ७०० वर्षांपूर्वीचा एक किल्ला आहे. दिल्लीपासून जयपूरच्या दिशेने जाताना सुमारे १०० किलोमीटर अंतरावर हा किल्ला लागतो. या ठिकाणी निमराणा समूहाचे अमननाथ यांच्या प्रयत्नांतून दर शनिवारी लोककलाकार आपली कला सादर करतात. विशेष म्हणजे, आता या कलांचे सादरीकरण लोकप्रिय होत असून प्रेक्षकगण आवर्जून तिथे येऊ लागले आहेत. ऑक्टोबर ते मार्च हा तसा कडक उन्हाळ्याचा काळ. परंतु त्याही दिवसांत दर शनिवारी

पर्यटक तिथे आवर्जून राहायला आलेले असतात. तेसुद्धा कलेच्या ओढीने. लोककलावंतदेखील खास या आलेल्या पाहुण्यांसाठी अगत्यपूर्वक आपली कला सादर करतात. येथे साकारलेल्या ॲम्फी थिएटरमध्ये बसून पर्यटक त्यांचा आस्वाद घेत असतात. स्थानिक तसेच देशभरातील कलाकार यात आवर्जून सहभागी होतात. ही किमया अमननाथ यांनी केवळ याच ठिकाणी घडवून आणली आहे, असे नाही. त्यांनी देशातील एकंदर १८ राज्यांमध्ये ३२ ठिकाणी हा प्रयोग सुरू केलेला असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळताना दिसतो. अमननाथ यांच्या अशा या प्रयत्नांद्वारे दरवर्षी १०० पेक्षा अधिक विख्यात संगीतकार, नर्तक, चित्रकार, शिल्पकार तसेच अन्य कलांमधील रचनाकार यांना त्यांच्या ठायीची कला मुक्तपणे रसिकवर्गाच्या पुढ्यात सादर करण्याचे व्यासपीठ उपलब्ध झालेले आहे, होते आहे. स्थानिक परिसरातील कलांना उत्तेजन मिळावे, ही भूमिका या सा-या प्रयत्नांमागे आहे. या महोत्सवांमध्ये कलेचा आनंद लुटून परत जाताना रसिकांनी या कलानुभवाच्या स्मृतीही आपल्याबरोबर घेऊ न जाव्यात, ही अमननाथ यांची तळमळ आहे.

**कलाप्रेमी बडोदा विद्यापीठ**

भरतनाट्यम् या दक्षिणेतील नृत्यप्रकाराचा प्रवेश पश्चिम भारतामध्ये कसा घडून आला, या संदर्भात एक रोचक कहाणी सांगितली जाते. बडोदानरेश सयाजीरावमहाराज गायकवाड यांचा विवाह तंजावरच्या श्रीमंत चिमणाबाईमहाराजांशी १८८३ साली झाला. त्या सोहळ्यादरम्यान दोन देवदासी नृत्याची अदाकारी करण्यासाठी बडोदा येथे आलेल्या होत्या. पश्चिम भारतामध्ये भरतनाट्यम् या दाक्षिणात्य नृत्यशैलीचा प्रथम प्रवेश झाला तो असा. इथूनच मग पुढे भरतनाट्यम् उत्तरेकडेही पसरले. बडोदानरेश सयाजीरावांनी त्यांची बव्हंश संपत्ती शैक्षणिक कार्यासाठीच वेचली. बडोदा विद्यापीठ साकारले ते त्यांतूनच. विद्यापीठामध्ये कलेला प्राधान्य असलेच पाहिजे, यांवावत महाराजांचा कटाक्ष आरंभापासूनच राहिला. आजही ही ऐतिहासिक संस्था कलेच्या संगोपनामध्ये कार्यरत आहे. मेहरानगड येथील युवराज मार्तंडसिंग यांनी आपल्या त्या ऐतिहासिक वास्तूमध्ये लोककलांचा जागर करण्याची विनंती गजसिंग यांच्या कौटुंबिक न्यासाला सुमारे तीन



दशकांपूर्वीच केली होती. त्या उपक्रमाद्वारे मेहरानगड किल्ल्याचे पुनर्नविनीकरण होण्याबरोबरच स्थानीय लोककलांचेही पुनरुज्जीवन साध्य बनलेले आहे. जयपूरमधील डिग्गी पॅलेस येथे दरवर्षी एक साहित्य महोत्सव भरवला जातो. देशभरातील साहित्यप्रेमी, साहित्यिक, लेखक, वाचक या महोत्सवामध्ये आवर्जून सहभागी होतात आणि साहित्यप्रेमाला चालना देतात. लखनौचे नवाब वाजिद अली शाह यांचा राजेशाही महाल 'इंद्रसभा' या नावाने ओळखला जातो. १९ व्या शतकात एक आगळेच महत्त्व मिरवणा-या या वास्तूमध्ये आता अनेक सांस्कृतिक उपक्रम, मोठे नृत्य आणि संगीत महोत्सव उत्तरप्रदेश शासनाच्या वतीने आयोजित केले जातात. त्या त्या भागातील सांस्कृतिक आणि कलात्मक वैभव हे त्या त्या ऐतिहासिक वास्तूंच्या पार्श्वभूमीवर बहरावे, ही त्या त्या राज्यांमधील पर्यटन महामंडळांची कल्पना चांगलीच यशस्वी होताना दिसते आहे.

**राज्याराज्यांत कलाप्रसार**

झारखंडमधील चेराईकेल्ला राजभवनामध्ये चैत्रामध्ये (एप्रिलच्या मध्यात) 'छाहू' हा एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम आयोजित केला जातो. या राजगृहातील आश्रयामुळेच आज ही कला सर्वदूर पोहोचलेली आहे. म्हैसूर या सा-यांमध्ये अर्थातच आघाडीवर आहे. म्हैसूर येथे दिमाखात साज-या होणा-या दस-याच्या निमित्ताने तेथील ऐतिहासिक वास्तू आणि महालांमध्ये सलग नऊ दिवस अनेक सांस्कृतिक उपक्रम साकारत असतात. नागालँडमध्ये असाच एक 'हॉर्नबिल फेस्टिव्हल' साजरा होत असतो. ओडिशा येथील अनेक मंदिरांमध्ये आता नृत्य महोत्सव, कला महोत्सव यांचे आयोजन ओडिशा राज्य पर्यटन महामंडळाच्या पुढाकाराने केले जात असते. केरळमध्ये असाच एक 'निशिगंधी फेस्टिव्हल' आयोजित केला जातो. तो पाहण्यासाठी व त्या महोत्सवादरम्यान सादर होणा-या कलांचा आस्वाद घेण्यासाठी देशभरातून रसिकवर्ग तिथे एकवटत असतो. कलांच्या जपणुकीसाठी आपल्या देशात असे ठायी ठायी जे जे प्रयत्न आजमितीस सुरू आहेत ते निश्चितच स्तुत्य आहेत. राजाश्रय लोपला तरी कला लोपणार नाहीत; लोकाश्रयाच्या बळावर त्या अशाच पद्धतीने विविधांगांनी सतत बहरत राहतील, असा दिलासाच जणू हे सारे उपक्रम आपल्याला देत आहेत. ■■

नागरीकरण

# जितकी छोटी तितकी स्वच्छ आणि सुंदर !

**कच-याची समस्या दिवसेंदिवस किती भीषण होत चाललेली आहे, हे नव्याने सांगायची गरज नाही. दर काही महिन्यांनी वेगवेगळ्या शहरांमध्ये कच-याच्या विल्हेवाटीचा प्रश्न पेटताना दिसतो. त्या प्रश्नामुळे आंदोलने होतात. 'शहरी विरुद्ध ग्रामीण' असेही स्वरूप आता या कच-याच्या प्रश्नातील वादाला लाभत चालले आहे. कच-याचे सुयोग्य व्यवस्थापन न होणे हा या प्रश्नाचा मूळ गाभा आहे. मात्र, नुकत्याच झालेल्या एका पाहणीद्वारे शहरे जितकी छोटी तितकी ती अधिक प्रभावीपणे कचरा व्यवस्थापनाच्या ध्येयधोरणांचा अवलंब करतात असे दिसून येते आहे.**

'स्वच्छ भारत वेस्ट पार्क' या योजनेच्या माध्यमातून भारतातील अनेक शहरांमधील जागा, ज्या पूर्वी कच-यासाठी 'डंपसाइट्स' म्हणून वापरल्या जात होत्या तिथेच आता 'वेस्ट मॅनेजमेंट पार्क' साकारत असल्याचे दिसून येते आहे. सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्न्मेन्ट (सीएसई) या दिल्लीस्थित संस्थेच्या माध्यमातून एक अभ्यास अलीकडेच करण्यात आला. देशातील ११ राज्यांतील २० सार्वजनिक संस्था त्या त्या भागात कचरा व्यवस्थापनाचे काम किती काटेकोरपणाने करीत आहेत याचे एक मूल्यमापन त्यामध्ये करण्यात आले. त्यानुसार, १ ते १० लाखांच्या आत लोकसंख्या असणारी जी शहरे आहेत अशा शहरांमध्ये, मोठ्या शहरांच्या तुलनेत, कच-याचे व्यवस्थापन अधिक सुनियोजित पद्धतीने होते असे दिसून आले आहे. 'फोरम ऑफ सिटीज् दॅट सेग्रिगेट' व्यासपीठांतर्गत छोट्या शहरांचा हा अभ्यास व पाहणी करण्यात आली.

या शहरांचे मूल्यमापन त्यांच्या २०१७-१८ या वर्षातील कामगिरीवर आधारित होते. कच-याचे सुयोग्य वर्गीकरण, कचरा गोळा करण्याची प्रभावी यंत्रणा, खड्ड्यांमध्ये त्याचे विघटन, विकेंद्रीकरणाच्या नवीन प्रक्रियांचा अंगीकार, घनकचरा तसेच प्लॅस्टिकयुक्त कच-याच्या व्यवस्थापनविषयक



नियमांचे कसोशीने पालन, ई-वेस्टचे संकलन आणि कचरा व्यवस्थापनातील नाविन्यपूर्णता या निकषांच्या आधाराने हे मूल्यमापन करण्यात आले. या पाहणीदरम्यान उभरून आलेली काही नमुनेदार उदाहरणे मननीय ठरतात.

**छोट्याशा वेंगुर्ल्याची आघाडी**

अवघी १५ हजार लोकसंख्या असणा-या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ल्याने यात मोठी आघाडी घेतली आहे. सर्वोत्तम कचरा व्यवस्थापनाचे प्रशस्तिपत्रक मिळवत वेंगुर्ल्याने पाच पारितोषिके पटकावली आहेत. महाराष्ट्रातील पाचगणी हे आणखी एक छोटे शहर यात यशस्वी ठरले आहे. मध्यम आकाराच्या शहरांमध्ये केरळच्या अलप्पुझा या शहराला तर मोठ्या शहरांमध्ये इंदूर आणि म्हैसूरला पारितोषिक जाहीर झाले. वेंगुर्ल्याची काही वर्षांपूर्वीची परिस्थिती अतिशय भीषण होती. तिथे दररोज सात टन कचरा जमा होतो. त्यातील ९५ टक्के कच-याचे यशस्वी वर्गीकरण करण्यात संबंधितांना यश आले आहे. विशेष म्हणजे, या वर्गीकरणाद्वारे, संकलित कच-यावर प्रक्रिया करून त्यांनी उत्पन्नाचा मार्ग शोधून काढला आहे. दर महिन्याला दीड लाख रुपये त्यांना केवळ कच-यातून मिळू लागले आहेत. ५० मायक्रॉन्सपेक्षा कमी जाडी असणा-या प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर आता बंदी जारी झालेली आहे (सार्वत्रिक प्लॅस्टिकबंदीपूर्वीच हा निर्णय वेंगुर्ल्यात झाला होता). याचे उल्लंघन करणा-यांना सुरुवातीला दोन वेळा इशारा दिला जायचा त्या नंतरही प्लॅस्टिकचा वापर केल्यास दंड आकारला जातो. परिसरात घाण करणारे, कच-याचे वर्गीकरण न करणारे यांनाही प्रशासनाने दंड आकारण्याची कारवाई सुरू केली. तिथे आता जे 'वेस्ट पार्क' उभारलेले आहे त्यात फळाफुलांची झाडे, सेंद्रिय शेती यासह जैववायू संयत्र, विटा तयार करण्याचा प्रकल्प, प्लॅस्टिकचे तुकडे करणारे संयत्र यांचा समावेश आहे. या शिवाय, कचरा व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणावर भर देण्यात आला. कचराव्यवस्थापनाविषयी जागरूकता लोकांमध्ये निर्माण करण्यात यशस्वी ठरल्याने वेंगुर्ल्यात एवढे परिवर्तन होऊ शकले. हा जो बदल घडून आला आहे त्याचे खरे शिल्पकार म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेमधील प्रशासन. शहर मोठे असो वा छोटे, तिथे स्वच्छता आणायची तर लोकांचा सहभाग ही अनिवार्य अशी बाब आहे, हेच यांतून सिद्ध होते.

**पाचगणीचा कायापालट**

'कचरा केंद्र' अशीच ओळख एके काळी असणारे शहर होते पाचगणी. आज ते अतिशय सुंदर, नयनरम्य थंड हवेचे ठिकाण आहेच पण त्याच्या जोडीला देशातील एक सर्वांत स्वच्छ शहर असाही त्याचा लौकिक आहे. या शहराची लोकसंख्या २०११ सालातील जनगणनेनुसार १४ हजार इतकी आहे. या शहराने १०० टक्के कच-याचे वर्गीकरण करण्यात यश मिळवले आहे. पाचगणीत दररोज जमा होणा-या सात टन कच-यापैकी साडेतीन टन ओल्या कच-यापासून जैविक, सेंद्रिय खत तयार करण्यासाठी शहरातच सुविधा तयार करण्यात आलेली आहे. त्यातून जे खत निर्माण होते त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थेला उत्पन्नाचा नवा मार्ग गवसला. उरलेला सुका कचरा प्रक्रियेसाठी पुण्यात पाठवला जातो. विक्री करण्याजोगा कचरा कचरावेचकांना देऊन त्याचा उपयोग रस्ते बांधणीसाठी केला जातो. पूर्वी जिथे कच-याचे ढीगच्या ढिग साचलेले असायचे तिथे आता एक सुंदर बाग साकारलेली असून आकर्षणाचे केंद्र बनलेली आहे.

**स्वच्छताप्रेमी अलप्पुझा**

केरळातील अलप्पुझा हे एक असेच महत्त्वाचे स्वच्छताप्रेमी शहर. या शहराची लोकसंख्या २ लाख ४० हजार. इथे दररोज ५८ टन कचरा गोळा होतो. त्या शहराच्या सर्व ५२ प्रभागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेने कचरा व्यवस्थापनाची प्रक्रिया यशस्वी पद्धतीने राबवलेली आहे. जेवणात अन्न जितके महत्त्वाचे तितके कच-याचे विघटन गरजेचे आहे, हा विचार ८० टक्के लोकांमध्ये रुजला असल्याचा स्थानिक प्रशासनाचा दावा आहे.

महापालिकेच्या वतीने केवळ सुका कचरा जमा केला जातो तर, ओल्या कच-यावर निवासी नागरिक आपापल्या घरातच प्रक्रिया करतात. केरळच्या 'ग्रीन प्रोटोकॉल'अंतर्गत तिथे संपूर्ण प्लॅस्टिक बंदी जारी केलेली आहे. कमी दरांमध्ये जैविक वायू आणि सेंद्रिय खतनिर्मितीचे तंत्रज्ञान व सुविधा उपलब्ध करून दिली जाते आहे. या शिवाय, कच-यापासून सेंद्रिय खते निर्माण करण्याची सुविधा शहरामध्ये २३ ठिकाणी उभारण्यात आली असून तिथे दररोज १५ ते २० टक्के कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मिती केली जाते.



**कल्पक इंदूर आणि स्वच्छतेचा लोकजागर**

मध्यप्रदेशातील इंदूर तर स्वच्छतेच्या बाबतीत आग्रही आणि स्वच्छतेचा विचार रुजवण्याबाबत कमालीचे कल्पक असल्याचे ही पाहणी सांगते. ४०० स्वयंसेवकांची मोठी फळीच या स्वच्छताकार्यात तिथे मनापासून उतरलेली आहे. इंदूर हे २७ लाख लोकसंख्येचे मोठे शहर. इथल्या समस्याही व्यापक. इथे दररोज जमा होतो ११५० टन कचरा. तरीही, एकदा स्वच्छतेचा ध्यास घेतला की मग या समस्यांवर मात करायचीच, अशा ऊर्मीने हे शहर भारले गेले. दृक्‌श्राव्य प्रसारमाध्यमांचा अत्यंत परिणामकारक वापर करत त्यांच्या माध्यमांतून केलेल्या चपखल जाहिरातींचा मोठा प्रभाव स्थानिकांवर पडला. शहरातील भिंतींचा वापर करत तब्बल दीड लाख चौरस मीटर इतक्या पृष्ठभागावर स्वच्छतेचे संदेश लिहून त्याद्वारे लोकजागर मांडण्यात आला. त्यातून जागृती निर्माण झाली. शहरातील सर्वच्यासर्व, म्हणजे, ८५ प्रभागांमध्ये कचरा वर्गीकरण प्रभावीपणे होईल यावर काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात आले. कचरा करणा-याला जागेवर दंड करण्याची प्रभावी यंत्रणा प्रस्थापित केली गेली. अवघ्या १८ महिन्यांत यातून ८० लाख रुपये उभे राहिले आणि कोठेही कचरा करून चालणार नाही, ही जाणीवही स्थानिकांत निर्माण झाली. उघड्यावर असणा-या ८५० कचरापेट्या इंदूर महापालिकेने हटवल्या. ओल्या कच-याचे व्यवस्थापन आणि त्यावर प्रक्रिया, तसेच पुनर्प्रक्रियेद्वारे पुनर्वापर करता येण्याजोग्या प्लॅस्टिकच्या विक्रीची यंत्रणा महापालिकेने प्रस्थापित केली. रस्तेनिर्मिती व सिमेंट उत्पादन करणा-या प्रकल्पांना हे प्लॅस्टिक पाठवले जाऊ लागले. यातून इंदूर शहर झपाट्याने चकाचक झाले.

कच-याच्या व्यवस्थापनात मागे राहिलेली अनेक शहरे देशात आहेतच. त्यात पटना, गया, दिल्ली अशा अनेक शहरांचा समावेश आहे. परंतु, ज्या छोट्या, मध्यम आणि मोठ्या आकारमानाच्या शहरांनी हे स्वच्छतेचे लक्ष्य साध्य केलेले आहे त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन उर्वरित शहरांनी स्वच्छतेचा मार्ग अनुसरला तर ती शहरेही स्वच्छ, सुंदर बनतील अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही. ■■

**संदर्भ :** डाऊन टू अर्थ, जुलै २०१८.

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

**INDIA'S FOREIGN POLICY**
**COPING WITH THE CHANING WORLD**
**Updated Edition with a New Chapter on Pakistan,**
**Author : Muchkund Dubey,**
**Orient BlackSwan Private Limited,**
**Hyderabad 500 029, 2017, Price : Rs. 495/-.**

भारताचा परराष्ट्र व्यवहार आणि परराष्ट्र व्यवहारविषयक धोरण यांसारख्या विषयांच्या अभ्यासकांनाच केवळ नव्हे तर, विद्यार्थ्यांनादेखील 'मुचकुंद दुबे' हे नाव अजिबातच अपरिचित नाही. मुळात, अर्थशास्त्राचे व्याख्याते म्हणून आपल्या व्यावसायिक जीवनाचा प्रारंभ करणारे दुबे त्या नंतर यथावकाश भारतीय परराष्ट्र सेवेमध्ये रुजू झाले आणि भारताचे परराष्ट्र सचिवपद भूषवून १९९१ साली ते सेवेमधून निवृत्त झाले. आंतरराष्ट्रीय संबंधांच्याबाबतीत स्वातंत्र्यानंतर भारताने अंगिकारलेल्या अलिप्ततावादी धोरणाचा प्रभाव साधारणपणे १९६०च्या दशकाच्या मध्यापर्यंत चांगल्यापैकी टिकून होता आणि भारताच्या वैश्विक प्रतिमेला त्याचा लाभही तिथवर होत राहिला. परंतु, त्या नंतर मात्र जागतिक स्तरावरील चित्र एकदम आणि वेगाने पालटले. तिस-या जगातील अनेक नवस्वतंत्र देशांनी विकासाच्याबाबतीत छलांग मारत भरीव आर्थिक प्रगतीद्वारे वैश्विक सत्तातोलामध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले. चीनचा आर्थिक उदय ही त्यांतील एक लक्षणीय बाब. त्या शर्यतीत तुलनेने मागे पडलेल्या भारताच्या वैश्विक सत्तातोलातील वजन आणि स्थान या दोहोलाही त्याची आच पोहोचली. या घडामोडींचा देशाच्या परराष्ट्रविषयक धोरणावर कसकसा परिणाम होत आला आणि त्यांतून देशाच्या परराष्ट्रनीतीची वाटचाल कशी उत्क्रांत होत राहिली याचा वेधक मागोवा सादर करणारा हा ग्रंथ परराष्ट्रधोरणाचे विश्लेषक व विद्यार्थी या दोघांनाही उपयुक्त ठरेल. ■■



भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे.
■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/ पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

- संस्थेचे नियामक मंडळ -
● विकास चित्रे ● किशोर चौकर ● सुरिंदर जोधका
● रमानाथ झा ● अभय टिळक ● रवींद्र ढोलकिया
●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे ●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे
● नीळकंठ रथ ● रूपा रेगे - नित्सुरे ● एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**